शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.२७/२०२२

| | |
|---|---|
| श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी<br>१९१, शाहूनगर,नेहरू उद्यानाजवळ,<br>जयसिंगपूर, ता.शिरोळ, कोल्हापूर | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | |
|---|---|
| १. खेडूत शिक्षण मंडळ कालकुंद्री, चंदगड<br>जि.कोल्हापूर.<br>२. र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड,<br>जि.कोल्हापूर. | वि.प. |

खेडूत शिक्षण मंडळ, कालकुंद्री, चंदगड, जि.कोल्हापूर यांचे र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड, जि.कोल्हापूर येथील शिक्षक श्री.सुहास व्यंकटेश कुलकर्णी यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१३/११/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी जून १९९८ पासून सदर महाविद्यालयात पूर्ण वेळ अधिव्याख्याता/ सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवेत आहे मी सेवेत कायम आहे. दि.०१/०१/२००६ पासून सहावा वेतन आयोग लागू झाला. आणि दि.०१/०१/२०१६ पासून ७ वा वेतन आयोग लागू झाला. मात्र मला या सुधारीत वेतन पुर्नरचनेचा लाभ दिलेले नाहीत. आजअखेर ५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीनुसार पगार दिला जात आहे.

तरी सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चित करून थकीत वेतनासह सर्व फरक अदा करणेबाबत व आता सातव्या वेतन आयोगानुसार होणा-या पुर्नरचनेप्रमाणे यापुढे वेतन देणेबाबत आदेश व्हावेत.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

माझी एकूण सेवा आजअखेर २४ वर्षांपेक्षा जास्त झाली आहे. मी नेमणूकीपुर्वीच नेट/सेट अर्हता धारण करीत असल्यामुळे मला स्थाननिश्चितीचे लाभ मिळणे आवश्यक होते. व आहे. मात्र एवढया प्रदीर्घ कालावधीत माझी फक्त २००६ साली पहिली स्थाननिश्चिती झाली. त्यानंतर २०११ मध्ये दुसरी स्थाननिश्चिती होणे आवश्यक होते. त्यासाठी आवश्यक असणारे रिफ्रेशर, ओरिएंटेशन कोर्स मी पूर्ण केले आहेत.

मात्र आजअखेर मला दुस-या स्थाननिश्चीतीचे लाभ देण्यात आले नाहीत. शिवाय सहाव्या व सातव्या वेतन पुर्नरचनेप्रमाणे त्यापुढील स्थाननिश्चीतीचे लाभ मला मिळणे आवश्यक होते. तेही दिलेले नाहीत. सबब, नियमाप्रमाणे मला देय असणारे स्थान निश्चितीचे लाभ मी ज्या तारखेस पात्र होतो त्या तारखेपासून फरकासह मला अदा करण्याबाबत सर्व संबधितांना आदेश व्हावेत.

**संस्थेचा अभिप्राय :**

श्री.एस.व्ही.कुलकर्णी यांच्या वेतननिश्चितीचे काम प्रलंबित राहण्याचे कारण म्हणजे त्यांची महाविद्यालयातील गैरहजेरी, बिनपगारी रजा आणि त्यांचे निलंबन व बडतर्फी आणि त्यानंतरच्या न्यायालयीन प्रक्रिया हे आहे.

श्री.कुलकर्णी यांचा दावा मुंबई हायकोर्टात प्रलंबित असल्यामुळे सहसंचालक कार्यालयाकडून स्थाननिश्चितीचा प्रस्ताव कोर्टाच्या निकालानंतर पाठवावा असे तोडी सांगितले जाते.

**समितीची निरिक्षणे :**

सदर प्रकरणाचा पूर्व इतिहास मे. पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आत्तापर्यत पारित झालेले आदेश या सर्वाचे अवलोकन केले असता या समितीचे मत असे आहे की, प्रस्तुतची तक्रार ही मुदतपूर्व आहे. बडतर्फ काळातील वेतन व भत्यांस तक्रारदार पात्र आहे किंवा नाही हा प्रश्न अद्यापही मा. उच्च न्यायलयासमोर प्रलंबित आहे. प्रस्तूतची तक्रार ही महाविद्यालयात गैरहजर राहिल्यामुळे त्यास निलंबीत करुन खातेनिहाय चौकशी करुन त्यास दि. २३.०४.१२ रोजी सेवेतून बडतर्फ करण्यात आले. याविरुध्द् त्यांनी मे. पीठासीन अधिकारी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचेसमोर अपील दाखल केले असून त्याचा अपील क्रमांक १४/२०१५ (S) असा होता. त्याचा निकाल दि. २१.०४.२०१७ रोजी लागला. त्या निकालाची प्रती या प्रकरणी दाखल करण्यात आली आहे. सदरचे

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती ★ कोल्हापूर.

अपील अशंतः मंजूर करण्यात आले होते आणि दि.०३.०८.२०१५ रोजीचा सेवामुक्ती आदेश खारिज करण्यात आला व तक्रारदारास दि.०३.०८.२०१५ पासून त्याची सेवा मूळ पदावर म्हणजे अधिव्याख्याता या पदावर आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यात आत पुर्नस्थापित करण्याचा आदेश पारित करण्यात आला. तसेच व्यवस्थापनेस तक्रारदारास जारी करण्यात आलेल्या दोषारोप पत्रातील आरोप क्र.२ वगळता इतर आरोपाची नव्याने चौकशी करण्याची मुभा देण्यात आली आणि दरम्यानच्या काळातील थकीत वेतन व इतर लाभ जर नव्याने खातेनिहाय चौकशी करण्याचे व्यवस्थापनाने ठरविले तर खातेनिहाय चौकशीच्या निकालावर अवलंबून राहिल असे मे. पीठासीन अधिकारी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांनी आदेश पारित केले आहेत. या आदेशाविरुध्द् प्रस्तुत तक्रारदारांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्रमांक ९१११/२०१७ दाखल केलेली असून ती याचिका अद्यापही प्रलंबित असल्याचे दिसून येते. दि.१५.०१.२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणामध्ये पुढील आदेशापर्यंत मे. पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचे दिनांक २१.०४.२०१७ चा आदेश अमंलात आणला जाणार नाही अशा स्वरुपाचा अंतरिम आदेश पारित केलेला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, सदर संस्थेचे चेअरमन हे मरण पावलेले असून विश्वस्त मंडळ विसर्जित झालेले असल्याने आणि नव्याने निवडणुका घेण्याचे आदेश पारित झाल्यामुळे तक्रारदाराविरुध्द् नव्याने खातेनिहाय चौकशी सुरु केली जाईल किंवा नाही याबद्दलचे ठोस निवेदन मा.उच्च न्यायालयासमोर करता येऊ शकत नाही असे निवेदन संस्थेमार्फत मा.उच्च न्यायालयासमोर केल्याचे आदेशात नमूद केलेले आहे. या समितीसमोर झालेल्या युक्तिवादा दरम्यान तीच परिस्थिती आजही अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे अद्यापही तक्रारदारा विरुध्द् नव्याने खातेनिहाय चौकशी सुरु झाली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मे. पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांच्या आदेशानुसार तक्रारदाराच्या थकीत वेतनाच्या पात्रतेसंबंधी अद्यापी कोणतेही निर्णय झालेला नाही. सबब तक्रारदार यांच्या वेतननिश्चितीचे काम प्रलंबित राहण्याचे कारण म्हणजे त्यांची महाविद्यालयातील गैरहजेरी, बिनपगारी रजा आणि त्यांचे निलंबन व बडतर्फी आणि त्यानंतरच्या न्यायालयीन प्रक्रिया हे आहे. श्री.कुलकर्णी यांचा दावा मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे सहसंचालक कार्यालयाकडून स्थाननिश्चितीचा प्रस्ताव कोर्टाच्या निकालानंतर पाठवावा असे तोंडी सांगितले जाते असे जाबदार यांनी नमूद केले आहे. त्यामुळे समिती या निष्कर्शास येते की, तक्रारदाराच्या तक्रारीतून मागणी ही मुदतपूर्व आहे आणि ती आज या घटकेला मान्य करता येत नाही. सबब, प्रस्तुतची तक्रार आज

विद्यापीठ, तक्रार निवारण समिती ★ कोल्हापूर.

घटकेला अमान्य करावी लागेल असे समितीचे मत आहे. करीता ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 26 MAR 2024

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**सदस्य**
**(श्रीमती ए.एच.कोलेकर)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)**

**सदस्य**
**(डॉ.व्ही.एन.शिंदे)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)**

**सदस्य**
**(श्री.एस.यु.शिंदे)**

**अध्यक्ष**
**(श्री.ए.व्ही.देशपांडे)**